आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत
बांधकामविषयक कामांना प्रशासकिय मान्यता
देण्यासंदर्भात सुधारित अटींचा समावेश
मार्गदर्शक तत्वांमध्ये करणे

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन पूरकपत्र क्रमांकः स्थाविका-१२१७/प्र.क्र.१६१ /का. १४८२,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादामा कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२
तारीख: ६ फेब्रूवारी, २०१८

<u>वाचा :-</u>

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का. १४८२, दिनांक १२/७/२०१६
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक ३१/८/२०१७

<u>प्रस्तावना</u>:- आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधकाम विषयक कामांसंदर्भात जिल्हाधिकारी यांनी कार्यान्वयीन यंत्रणाना प्रशासकिय मान्यता दिल्याप्रमाणे प्रत्यक्ष कामे होत नाहीत, असे शासनाच्या निदशर्नास आले आहे. त्या अनुषंगाने बांधकामविषयक कामांना जिल्हाधिकारी यांच्याकडून देण्यात येणाऱ्या प्रशासकिय मान्यतेच्या आदेशात तसेच कार्यान्वयीन यंत्रणा व कंत्राटदार यांच्यामध्ये होणाऱ्या करारात सुस्पष्टता तथा पारदर्शकता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन पूरकपत्र:-

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधकाम विषयक कामांना जिल्हाधिकाऱ्याकडून प्रशासकिय मान्यता देण्यासंदर्भात सुस्पष्टता तथा पारदर्शकता असावी यासाठी नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/ प्र.क्र.९६/का.१४८२, दि. १२ जुलै, २०१६ च्या "परिच्छेद ३.५" मध्ये पुढील " परिच्छेद ३.५. अ " चा समावेश करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

I. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधकाम विषयक प्रस्तावित कामांना जिल्हाधिकारी यांनी प्रशासकिय मान्यता देतांना नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/ का.१४८२, दिनांक १२/७/२०१६ व दिनांक ३१/८/२०१७ मधील तरतूदींचे सक्तीने पालन करावे.

II. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधकाम विषयक प्रस्तावित कामांना जिल्हाधिकारी यांनी प्रशासकिय मान्यता आदेश निर्गमित करतांना बांधकामासाठी किती 'जमिनक्षेत्र' (Area of Land) वापरावे, याबाबत स्पष्ट उल्लेख करावा. प्रशासकिय मान्यतेच्या आदेशात 'बांधकामाचे क्षेत्र ' (Built-up Area) आणि 'चटई क्षेत्र' (Carpet Area) काय असेल, याबाबत देखील स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच शक्यतो 'GPS Location' प्रशासकिय मान्यता आदेशात नमूद करण्यात यावे.

III. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकिय मान्यता आदेशानुसार 'कार्यान्वयीन यंत्रणा' (Implementing Agency) व 'कंत्राटदार' (Contractor) यांच्यामध्ये होणाऱ्या करारामध्ये देखील उपरोक्त बाबींचा स्पष्ट उल्लेख असावा. त्यामध्ये प्रामुख्याने अनुज्ञेय बांधकामाचा प्रकार (Type of Construction) व 'जमिन क्षेत्र ' (Area of Land), 'बांधकामाचे क्षेत्र' (Built-up Area) आणि 'चटई क्षेत्र' (Carpet Area) किती राहील त्याचा स्पष्ट उल्लेख असावा. तसेच 'कार्यान्वयीन यंत्रणा' (Implementing Agency) व 'कंत्राटदार' (Contractor) यांच्यामध्ये होणाऱ्या करारामध्ये मंजूर 'इमारत बांधकाम रेखाचित्र' (Building Plans & Drawings) यांचाही समावेश करणे बंधनकारक करावे. यापुढे अशी बांधकाम रेखाचित्र (Building Plans & Drawings) हे कराराचा भाग असणे अनिवार्य राहील. प्रशासकिय मान्यतेव्यतिरिक्त बांधकामामध्ये भर घालणे/सुधारणा करणे/बांधकामाचे क्षेत्रामध्ये बदल करणे किंवा जमिन वापराच्या प्रयोजनामध्ये बदल करणे इत्यादी बाबी जिल्हाधिकारी व सक्षम 'नियोजन प्राधिकरण ' (Planning Authority) यांच्या पुर्वमान्यतेशिवाय करता येणार नाहीत.

२. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्यांनी सूचविलेल्या सामाजिक सभागृह/अंगणवाडी/बालवाडी/व्यायामशाळा इत्यादी बांधकाम विषयक कामास प्रशासकीय मान्यता देतांना तसेच 'कार्यान्वयीन यंत्रणा ' (Implementing Agency) व संबंधित 'कंत्राटदार ' (Contractor) यांच्यामध्ये करार करतांना वरील तरतूदींची काटेकारेपणे अंमलबजावणी करण्याची खबरदारी जिल्हाधिकारी व कार्यान्वयीन यंत्रणांनी घ्यावी.

३. सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०२०६१७१०२६३४१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Dattatraya Joshi

Digitally signed by Anil Dattatraya Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d7de9577f1b6301ba91e582c9402233953565e9fd17971ff1b7a2b8a94cf42c6, cn=Anil Dattatraya Joshi
Date: 2018.02.06 17:14:04 +05'30'

(अ. द. जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव,
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
६. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
७. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
९. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१३. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१५. संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य मुंबई,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१७. सर्व उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्ताची कार्यालये,
१८. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्राने).
२१. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२३. भारतीय जनता पाटी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक क्र.१,योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक,नरीमन पॉईंट, मुंबई-२०
२४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
२५. महाराष्ट्र कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी),महाराष्ट्र कमिटी,जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस,वरळी,मुंबई-१३,
२६. इंडीयन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
२७. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१,
२८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८,
२९. निवडनस्ती, कार्यासन १४८२, नियोजन विभाग.